प्रेसनोट                    दिनांक २१/०३/२०१९

## खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

## सराईत गुन्हेगारास एक (१) वर्षाकरीता तडीपार

मा.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर व मा. शिवाजी बोडखे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांनी आगामी लोकसभा निवडणूक २०१९ व विधानसभा निवडणूक २०१९ च्या काळात पुणे शहरात कोणताही अनुचीत प्रकार घडु नये व आपले गुन्हेगारी वर्चस्व निर्माण करणारे टोळीचा/गुन्हेगारांचा समुळ नायनाट करण्यासाठी व त्यांचेविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

खडक पोलीस स्टेशन पुणे चा गुन्हे अभिलेखावरील सराईत व शरिराविरूदध गुन्हे करणारा अटट्ल गुन्हेगार नामे- राहुल श्रीनीवास रागीर वय २० वर्षे रा. फ्लॅट नं २२, दुसरा मजला, सहारा कॉम्प्लेक्स, ३४३ घोरपडे पेठ, पुणे याचेविरुध्द खडक पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गंभ्रीर मारामारी, बेकायदेशीर जमाव जमवुन हातात अग्निशस्त्र व घातक हत्यार बागळून मारामारी करणे अश्याप्रकारचे एकुण गंभ्रीर स्वरूपाचे ०२ गुन्हे दाखल आहेत. तसेच त्यांचेकडून होत असलेल्या बेकायदेशीर कृत्यांना आळा बसणेसाठी सन २०१७ साली १ वर्ष मुदतीचा चांगल्या वर्तवणुकीचे बंधपत्रही घेण्यात आले होते. यानंतरही त्याचे वर्तवणुकीत काही एक सुधारणा झाली नाही व त्याने आपले गुन्हेगारी,बेकायदेशीर कृत्य चालुच ठेवली होती.

नमुद गुन्हेगार नामे- राहुल श्रीनीवास रागीर वय २० वर्षे रा. फ्लॅट नं २२, दुसरा मजला, सहारा कॉम्प्लेक्स, ३४३ घोरपडे पेठ, पुणे याचेविरुध्द वेळोवेळी कारवाई करुनही त्याचे वागणुकीत काहीएक फरक पडलेला नव्हता. तो अत्यंत क्रुर, खुनशी व भांडखोर असुन तो लोकांमध्ये काहीना काही कुरापती काढुन मारहाण करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे करीत आहे. सर्वसामान्य, शांतताप्रिय नागरीकांना विनाकारण त्रास देवुन आपला गुन्हेगारी हेतु साध्य करीत आहे. त्याने घोरपडे पेठ, लोहियानगर, गंजपेठ भागात आपली भयंकर दहशत निर्माण केली आहे, त्याचे दहशतीमुळे व भितीपोटी त्याचेविरुध्द तक्रार देण्यास कोणीही पुढे येत नव्हते. त्याचे अशा कृत्यामुळे सर्वसामान्य नागरीकांचे मनात भिती निर्माण होवुन त्यांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता. म्हणुन त्यास पुणे शहर आयुक्तालय व पुणे जिल्हयातुन हदद्पार करण्या बाबतचा प्रस्ताव श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ पुणे शहर यांचेकडे पाठविण्यात आला होता, त्यानुसार त्यांनी त्यास दिनांक- २०/०३/२०१९ रोजी पासून पुणे शहर व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातुन एक वर्षाकरीता तडीपार केलेले आहे.

अशा प्रकारे आगामी लोकसभा व विधानसभा निवडणूक, सण व उत्सव काळात कोणताही अनुचीत प्रकार घडु नये या अनुषंगाने खडक पोलीसांकडुन समाजकंटक व अटट्ल गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले असुन त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्याचे संकेत खडक पोलीसांनी दिले आहेत.

सदर कारवाई फरासखाना विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.प्रदिप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. उत्तम चक्रे, पोलीस उप निरीक्षक रत्नदीप गायकवाड, व महेश बारवकर, महेश कांबळे, दिपक मोधे यांनी भाग घेवुन प्रस्ताव तयार केलेला आहे.